# MAHAVITARAN

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# DIARY

# 2026

# महाराष्ट्राचा विश्वविक्रम, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने घेतली नोंद!

## ३० दिवसांत ४५,९११ सौर कृषिपंप स्थापित व कार्यान्वित करण्याचा जागतिक उच्चांक




दिवसा वीजपुरवठ्यासह शेतकऱ्यांना वीजबिलातून मुक्ती देणाऱ्या 'मागेल त्याला सौर कृषिपंप' या योजनेतून महावितरणने केवळ ३० दिवसांमध्ये ४५,९११ सौर कृषिपंप बसवून कार्यान्वित करण्याचा जागतिक उच्चांक नोंदविला. लंडन येथील गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने हा विश्वविक्रम असल्याचे जाहीर केले व त्याची अधिकृत नोंदही घेतली.

छत्रपती संभाजीनगर येथे दि. ५ डिसेंबर २०२५ ला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांना 'गिनीज'चे निरीक्षक (लंडन) श्री. कार्ल सॅविले यांनी प्रदान केले.

यावेळी अपारंपरिक ऊर्जा मंत्री श्री. अतुल सावे, राज्यमंत्री (ऊर्जा) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, विधीमंडळ सदस्य आ. संजय केणेकर, आ. सुरेश धस, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे, आ. प्रशांत बंब तसेच मा. मुख्यमंत्री महोदय यांचे मुख्य आर्थिक सल्लागार श्री. प्रवीण परदेशी, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक श्री. आदित्य जिवणे, सहसचिव (ऊर्जा) श्री. नारायण कराड, स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक, संचालक श्री. सचिन तालेवार (प्रकल्प) श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर आदींची उपस्थिती होती.

### ठळक वैशिष्ट्ये

- शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा
- वीजबिलापासून मुक्ती
- ९० ते ९५ टक्के अनुदानात सौर कृषिपंप व पॅनेल्स उपलब्ध
- देशात स्थापित एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६० टक्के सौर कृषिपंप महाराष्ट्रामध्ये.

# महाराष्ट्रामध्ये जगातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प पूर्णत्वाकडे!







पीएम कुसुम सी- मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत शेतकऱ्यांसाठी २४५८ मेगावॅट क्षमतेच्या ४५४ सौर ऊर्जा प्रकल्पांचे ऑनलाइन लोकार्पण मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. २५ सप्टेंबर २०२५ ला झाले. यावेळी मा. केंद्रीय नवीन व नवीकरणीय मंत्री श्री. प्रल्हाद जोशी, मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मा. पंतप्रधान यांनी महाराष्ट्रातील लाभार्थी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला व या सौर प्रकल्पाची यशोगाथा जाणून घेतली.